# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ४४२ दिनांक - २७/१२/२०२३

## पॉर्नोग्राफी व्हिडीओ शुट करुन इंटरनेट वेबसाईटवर अपलोड करणारे आरोपीत यांना अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष -३ यांना यश

दिनांक ०१/११/२०२३ रोजी १६.०० वा ते २३.०० वाजे दरम्यान ''जे.के. व्हिला हॉटले मार्टीन इन'' मौजे अर्नाळा, ता. वसई, जि. पालघर येथे महिला फिर्यादी वय १८ वर्षे व साक्षिदार यांना आरोपीत यांनी पिक्चरमध्ये काम देण्याकरीता ऑडीशनच्या बहाण्याने फसवणूक करुन त्यांचा ऑडिशनच्या बहाण्याने तयार केलेला नग्न व्हिडीओ स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता वेगवेगळया इंटरनेट वेबसाईटवर प्रदर्शित केल्याने फिर्यादी यांची समाजात खुप बदनामी झाली म्हणुन फिर्यादी यांनी दिनांक १२/१२/२०२३ रोजी फिर्याद दिल्याने अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ३८९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०, ५०१, ३४ सह आय.टी. ॲक्ट २००० चे कलम ६६ (ई), ६७, ६७ (अ) प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

नमुद दाखल गुन्हयाचे मा. वरिष्ठा गांभिर्याने दखल घेवुन सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ विरार कडे देण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदार यांच्या मार्फतीने मिळालेल्या बातमीवरुन आरोपीत नामे अनुजकुमार जयप्रकाश जैयसवाल, वय ३० वर्षे, रा. विरार पुर्व, ता. वसई जि. पालघर, व एक महिला आरोपीत वय ३३ वर्षे यांना दिनांक १५/१२/२०२३ रोजी अटक केले होते. त्यानंतर दिनांक १७/१२/२०२३ रोजी गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे सर्जु कुमार रमाकांत विश्वकर्मा, वय २५ वर्षे, रा. बदलापुर पश्चिम, जि. ठाणे. यास अटक करण्यात आली असुन अटक आरोपीत यांचे कडुन पॉर्नोग्राफी व्हिडीओ शुटींग करीता लागणारे मोबाईल फोन, लॅपटॉप, शुटींग करणे करीता लागणारे ट्रायपॉड, गिंबल, शुटींग लाईट इत्यादी असा १,९०,६५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन अटक आरोपीत यांना दिनांक २७/१२/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/प्रमोद बडाख, पोउपनिरी/अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/अशोक पाटील, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

----------ooooo----------